# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U / 190 / 2009 / 24 /** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect Shri Shashikant Ganpatrao Vaidya, Paritosh ,Shilpanagar, Railway Station Road, Aurangabad. (Consumer No. 490010679629).

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Shashikant Ganpatrao Vaidya, Paritosh ,Shilpanagar, Railway Station Road, Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.

The hearing in this matter is kept on 24/03/2009 at 11=30 Hrs.

Encl: As above

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**

**Shri Shashikant Ganpatrao Vaidya,**
Paritosh ,Shilpanagar, Railway
Station Road, Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९०/२००९/२४**

**तक्रार दाखल दिनांक :- ०६/०३/२००९**
**निकाल दिनांक :- ०२/०५/२००९**

**श्री शशिकांत गणपतराव वैद्य,**
**''पारीतोष''शिल्पनगर,**
**रेल्वेस्टेशन रोड ,**
**औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०६/०३/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/०३/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना ऑगस्ट २००८ मध्ये ६९६०/-चे वीज बिल आकारण्यात आले. चुकीच्या वाढीव बिलाबाबत त्यांनी महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे तक्रार केली पण त्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे आक्टोबर २००८ मध्ये त्यांना २८४०/- चे वाढीव रक्कमेचे वीज बिल आकारण्यात आले.मार्च महीन्यात रुपये ५२५०/- चे बिल देण्यात आले. या सतत देण्यात येणा-या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे अर्जदाराने मंचात ही तक्रार दाखल केली असुन वीज वापराप्रमाणे सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक २४/०३/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार श्रीमती अनुराधा वैद्य उपस्थित होत्या महावितरणतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर व कार्यकारी अभियंता श्री खदांरे उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच वीज बिल विभागुन त्यांना सुधारीत बिल देण्यात आल्याचे व ते अर्जदारास मान्य असल्याचे मंचासमोर सांगितले.अर्जदार यांनी वाढीव बिल भरले असल्याचे सांगत मीटर फास्ट असल्यामुळे वाढीव बिल येत असल्याचे सांगितले.नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या सी.पी.एल.चे निरिक्षण केल्यावर अर्जदाराच्या वीज वापराच्या नोंदीत मोंठी तफावत असल्याचे दिसुन आल्यामुळे नोडल अधिकारी यांना अर्जदाराचे मीटर बदलण्याचा आदेश मंचाने दिला व मीटर तपासणी करुन त्याचा अहवाल

तसेच स्थळ पाहणी अहवाल मंचात दाखल करण्याचा आदेश दिला व पुढील सुनावणी दिनांक ०८/०४/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक ०८/०४/२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे मीटर बदलण्यात आले नसल्याचे मंचासमोर सांगितले मंचाने अर्जदाराचे मीटर ११/०४/२००९ पर्यंत बदलुन चाचणी अहवाल मंचात दाखल करण्याचा आदेश दिला व पुढील सुनावणी १५/०४/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १५/०४/२००९ रोजी नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे मीटर बदलण्यात आल्याचे सांगितले व अर्जदाराच्या जुन्या मीटरचा चाचणी अहवाल मंचात दाखल केला. मंचाने चाचणी अहवालचे निरिक्षण केल्यावर त्यात अनेक त्रुटी आढळुन आल्यामुळे यासंबधी खुलासा करण्याचा आदेश दिला तसेच मंचाने मागणी करुन देखील स्थळ पाहणी अहवाल दाखल करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आणुन दिले. या पुढील सुनावणी दिनांक २१/०४/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत करण्यात आले.

५) दिनांक २१/०४/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी श्रीमती अनुराधा वैद्य तसेच महावितरणतर्फे नोडल अधिकारी श्री एस.जी.राठौर,चाचणी विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री खंदारे तसेच रेत्वे स्टेशन उपविभागाचे कनिष्ठ अभियंता श्री बडवे उपस्थित होते.श्री खंदारे यांनी चाचणी अहवाल अपुर्ण असल्याचे मान्य केले. नोडल अधिकारी यांनी मंचात पुर्ण चाचणी अहवाल दाखल करण्याचे कबुल केले.मंचाने मीटरची तपासणी योग्य केलेली नसल्याचे आढळुन आल्यामुळे सदरील मीटर हे महावितरणतर्फे नवीन उघडण्यात आलेल्या टेस्टींग लॅबमध्ये दिनांक २४/०४/२००९ पर्यंत मंचासमोर चाचणी करण्याचा आदेश दिला

६) दिनांक २१/०४/२००९ रोजी मीटर चाचणीबाबत मंचाने दिलेल्या आदेशाचे पालन न गेल्यामुळे तसेच स्थळ पाहणी अहवाल दिनांक २४/०४/२००९ पर्यंत मंचात दाखल न केल्यामुळे मंचाने हे प्रकरण निकालासाठी ठेवले.

अर्जदार व महावितरणतर्फे नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरुन असे आढळुन येते की, महावितरण कंपनीने अर्जदारास घरगुती वापरासाठी वीज पुरवठा दिलेला असुन वीज वापराची नोंद घेण्यासाठी लावण्यात आलेल्या मीटरचा क्रमांक ९००००१६८४४ असा आहे. अर्जदाराचा मार्च २००८ पर्यंत वीज बिलाबाबत कोणताही वाद नव्हता सी.पी.एल.चे निरिक्षण केल्यावर एप्रिल २००८ मध्ये महाविरतणतर्फे अर्जदाराचे मीटर बदलण्यात आले व त्याजागी ९००००८३५८८७ या क्रमांकाचे नवीन मीटर लावण्यात आले. नंतर अर्जदारास खालील प्रमाणे वीज बिल देण्यात आलेली दिसुन येतात.

| महीना | मागिल रिडींग | चालु रिडींग | वीज वापर | शेरा |
|---|---|---|---|---|
| एप्रिल ०८ | ०१ | ०१ | १५४ | सरासरीवर आधारीत |
| मे ०८ | ०१ | ०१ | १५४ | सरासरीवर आधारीत |
| जुन ०८ | ०१ | १५० | १६७ | जुन्या मीटरचे १८ युनीट |
| जुलै ०८ | १५० | १४४५ | १२९५ | |
| ऑगस्ट ०८ | १४४५ | १४४५ | २७८ | सरासरीवर |
| सप्टेंबर ०८ | १४४५ | २१२० | ६७५ | |
| ऑक्टोबर ०८ | २१२० | २४९३ | ३७३ | |
| नोव्हेबर ०८ | २४९३ | २५९० | ९७ | |
| डिसेंबर ०८ | २५९० | २६६५ | ७५ | |
| जानेवारी ०९ | २६६५ | ३४९३ | ८२८ | |
| फेब्रुवारी ०९ | ३४९३ | ३६७९ | १८६ | |

महावितरणतर्फे अर्जदारास वरील काळासाठी देण्यात आलेल्या वीज बिलाचे निरिक्षण केल्यावर जुलै २००८ नंतरच्या काळातील वीज वापरात मोठ्या प्रमाणात तफावत आढळुन येते.अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान त्यांच्या वीज वापरात बदल झाला नसल्याचे ठामपणे सांगितले व मीटर योग्य प्रकारे वीज वापराची नोंद घेत नसल्याचे सांगितले मंचाने नोडल अधिकारी यांना स्थळपाहणी अहवाल तसेच संपुर्ण मीटर चाचणी अहवाल दिनांक २४/०४/२००९ पर्यंत दाखल करण्याचा आदेश दिला होता. तसेच नोडल अधिकारी यांनी दाखल केलेला चाचणी अहवाल अपुर्ण असल्याचे व त्या अहवालावरुन मीटरची चाचणी नियमीतपणे करण्यात आली नसल्यामुळे ते महावितरणतर्फे नवीन उघडण्यात आलेल्या टेस्टींग लॅबमध्ये चाचणी करण्याचे आदेश दिले होते. मार्च २००८ पर्यंत वीज वापराबाबत अर्जदार व महावितरण कंपनी यांचा कोणताही वाद नसल्याचे सी.पी.एल.वरुन स्पष्ट होते. मार्च २००७ ते मार्च २००८ या काळात अर्जदाराचे मीटर हे कार्यरत होते व त्यावर नोंदविल्या गेलेला वापर लक्षात घेता अर्जदारचा सरासरी वीज वापर हा १६१ युनीट असल्याचे दिसुन येते.

वरील सर्वबाबीचे निरीक्षण केल्यावर एप्रिल २००८ मध्ये मीटर बदली केल्यानंतर अर्जदारास देण्यात आलेल्या संशायस्पद वीज वापराचे बिल रदद्‌ करण्यात येत आहेत. अर्जदारास मागिल वीज वापराच्या सरासरीवर आधारीत वीज बिल आकरणी करणे योग्य ठरेल असे मंचाचे मत आहे.

मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)	महाविरतणतर्फे अर्जदारास एप्रिल २००८ नंतर देण्यात आलेली सर्व वीज बिल रदद्‌ करण्यात येत आहेत.

२)	महावितरणतर्फे अर्जदारास एप्रिल २००८ ते एप्रिल २००९ या काळासाठी १६१ युनीट प्रतिमाह वीज बिलाची आकारणी करावी व अर्जदारास ३० दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे.

३)	वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल देतांना कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये व अर्जदाराने वरील काळात भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९०/२००९/२४** **दिनांक ;-**

**प्रति**
**श्री शशिकांत गणपतराव वैद्य,**
**''पारीतोष''शिल्पनगर,**
**रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१९०/२००९/२४ )

आपण दिनांक ०६/०३/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**